# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिति

## कार्यपत्रिका क्रमांक - १६३

**सभावृत्तांत**

दिनांक - ०६.०४.२०१० वेळ-दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ०६.०४.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
६. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
७. मा.सौ.सुलोचना बबन बढे
८. मा.सुमनताई मधुकर पवळे
९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
१०.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
११.मा.थोरात एकनाथ दादा
१२.मा.तानाजी विठ्ठल खाडे
१३.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१४.मा.गावडे जयश्री वसंत
१५.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख, मा.भोसेकर,मा.गावडे,मा.सावंत,मा.गायकवाड,मा.फडणीस,मा.गायकवाड,मा.पवार-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्य लेखा परिक्षक, मा.काळे-नगरसचिव,मा.उगीले-शहर अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.जाधव,मा.कपिले,मा.कुदळे,मा.थोरात,मा.ढगे, मा.इंगळे,मा.बनकर,मा.चव्हाण,मा.निकम,मा.दुधेकर,मा.चिंचवडे,मा.सवणे,मा.पठाण-कार्य.अभियंता,मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-**

विषय क्रमांक :-२८) प्रभाग क्र.३२ संत तुकारामनगर येथील विरंगुळा केंद्राचे स्थापत्यविषयक सुधारणांची कामे करणेबाबत...

विषय क्रमांक :-२९) आकुर्डी खंडेरायाभाजी मंडई जवळील नाल्यावरील ५१ भाजी मंडई गाळे वितरणाबाबत...

विषय क्रमांक :-३०) आधार निधीतून शिष्यवृत्ती वाटप योजनेअंतर्गत संस्थेस धनादेश अदा करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३१) कासारवाडी येथे नव्याने सुरु होत असलेल्या म.न.पा.चे पिंपरी चिंचवड संशोधन केंद्र व संदर्भ ग्रंथालयाकरीता करारनाम्यानुसार पुस्तके खरेदी करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३२) मनपा हद्दीतील उद्यानांची देखभाल,विकास व संरक्षणाची कामे देणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३३) मनपा सार्वजनिक वाचनालयांकरीता सीएटी व इतर अभ्यासक्रमास उपयुक्त पुस्तके खरेदी करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३४) महिला व्यायामशाळा चालविणेस देणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३५) श्री गजानन महाराज मंदीर चॅरीटेबल ट्रस्ट यांना से.नं.२७, प्राधिकरण येथील श्री गजानन महाराज उद्यान देखभाल,विकास व संरक्षण करणेकामी ५ वर्षाकरीता देणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३६) मुख्य प्रशा. इमारतीमधील शिक्षण मंडळ विभागात बैठक व्यवस्था करणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३७) मनपाच्या सर्व संगणक संचांवर अधिकृत सॉफ्टवेअर बसविणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३८) वायरलेस ब्रॉड बॅण्ड सेवा उपलब्ध करुन देणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३९) वॉर्डातील दैनंदीन साफसफाई करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४०) उद्यान देखभाल, संरक्षण चालनकामी देणेबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४१) मे.मॅप्स इन्फोटेक या संस्थेची मनपाची अधिकृत संस्था म्हणून मान्यता घेणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४२) स्वामी समर्थ उद्यान अंशत: अनुदान तत्वावर देणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४३) सुदर्शन महिला हेल्थ क्लब देखभाल, संरक्षण व चालनकामी देणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४४) मोशी येथे शिवजयंती उत्सवाकरीता ध्वनीक्षेपण व विद्युत व्यवस्था करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४५) महिला बचतगट महासंघाच्या प्रकल्पाकरीता जागा देणेबाबत- मा.प्रभाकर वाघेरे, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४६) तरतूद वर्गीकरणाबाबत- मा.रामदास कुंभार,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

---------------------

दिनांक ३०.३.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९०६ विषय क्रमांक :- १
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३३/२०१० दि.१५/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१३ अन्वये, पिंपरी वॉर्ड क्र.७२ येथे स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी मे.के.कमलेश (नि.र.रू. ४२,०१,५८१/- [र.रू.बेचाळीस लाख एक हजार पाचशे एक्याऐंशी] पेक्षा ४२.९४ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२३,९७,४२२/- [र.रू.तेवीस लाख सत्यान्नव हजार चारशे बावीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट

कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९०७ विषय क्रमांक :- २

दिनांक-०६.०४.२०१० विभाग - भूमि आणि जिंदगी

सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.सुरदास गायकवाड

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/२/कावि/७०/१० दि.२०/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेच्या मालमत्तांचा विमा (दुर्घटना, जिवित हानीसह) उतरविण्यासाठी विविध विभागांकडून माहिती घेऊन विमा उतरविण्यास तसेच अग्निशामक विभाग व बहिणाबाई चौधरी सर्पउद्यान, विद्युत विभाग येथील कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा उतरविण्यास व त्या रक्कमेवरील वार्षिक प्रिमयम दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी कासारवाडी यांचेकडे जमा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------------

ठराव क्रमांक :- १०९०८ विषय क्रमांक :- ३

दिनांक-०६.०४.२०१० विभाग - पाणीपुरवठा मुख्यालय

सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/नि/कावि/१४०/१० दि.२३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.७/०९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, से.क्र.२० त्रिवेणीनगर येथील उंच पाण्याच्या टाकीच्या आवारात स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.जय इंजिनिअर्स (नि.र.रू.२२,९६,१३७/- [र.रू.बावीस लाख शहान्नव हजार एकशे सदोतीस] पेक्षा २८.०७ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९०९ विषय क्रमांक :- ४

दिनांक-०६.०४.२०१० विभाग - जनगणना

सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनगणना/१/कावि/७६/२०१० दि.२५/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जनगणना विभागाकडील कागदपत्रांचे झेरॉक्स पद्धतीने छपाई करुन घेण्यासाठी मे.सिद्धी कॉपीअर्स, संत तुकारामनगर, पिंपरी १८ यांना A-४ साईज (सिंगल)-र.रू.०.५०/-, A-४ साईज (पाठपोट)-र.रू.१.००/- या दराने देणेत आलेल्या कामास व त्या कामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१० विषय क्रमांक :- ५
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - प्रशासन
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/६/कावि/१६८/२०१० दि.२३/३/२०१०
विषय- श्रीमती जया रविंद्र महाडिक-निलंबित मुख्य लिपिक यांना सेवेतून काढून टाकण्याचा निर्णय घेण्याबाबत...

न्यायप्रविष्ट बाब असल्याने विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९११ विषय क्रमांक :- ६
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - झो.नि.पु. स्थापत्य
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/८७०/१० दि.२५/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/०८-०९ मधील अ.क्र.५ अन्वये, निगडी से.क्र.२२ येथील मनपाच्या शाळा क्र. २/२ येथे ९ वर्गखोल्या इमारत बांधणेकामी (फेरनिविदा) मे.व्यंकटेश्वरा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.३७,४६,०५०/- [र.रू. सदोतीस लाख शेहचाळीस हजार पन्नास] पेक्षा २९.५०% जास्त) (सन २००८-०९ चे दरसूचीशी तुलना करता १.०५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ४८,५१,१३५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर,सिमेंट,लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१२ विषय क्रमांक :- ७
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - जेएनएनयुआरएम कक्ष
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम कक्ष/३/कावि/२३५/१० दि.२६/०३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

JNNURM अंतर्गत प्रशासकीय सुधारणा (Reforms) नुसार Training & Capacity Building बाबत यशदा या संस्थेमार्फत Detail Project Report (DPR) बनविणेकामी र.रु.७५,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव प्राप्त झालेला असुन सदरचे कामकाज यशदा या संस्थेमार्फत थेट पद्धतीने, करारनामा न करता, निविदा न मागविता करणेत येणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१३ विषय क्रमांक :- ८
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.एएमसी/बप्र/कावि/९/४८/१० दि.२६/३/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभागाकडील नि.नो.क्र.५/०९/१० मधील अ.क्र.१ अन्वये, ब प्रभागांतर्गत तालेरा व जिजामाता हॉस्पिटल येथील EPBAX सिस्टीमची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ACE कम्युनिकेशन (नि.र.रू.१,४०,०४०/- [र.रू.एक लाख चाळीस हजार चाळीस] पेक्षा ५% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१४ विषय क्रमांक :- ९
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/६/कावि/६६/१० दि.२९/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.आरोग्य इक्झीबीटर्स, पुणे यांचेकडून आरोग्य विभागासाठी २० नग फॉगींग मशिन एकूण र.रु.५,७०,०००/- मध्ये खरेदी करणेसाठी करण्यात आलेल्या करारनाम्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१५ विषय क्रमांक :- १०
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्र.आमु/६/कावि/१२४/१० दि.२५/३/२०१०

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्यालयाकडील नि.नो.क्र.३/०९/१० अन्वये, मोशी कचरा डेपो येथे जमा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी $EM_1$ Maple बायोकल्चर द्रावण पुरवठा करणेकामी मे.भूमी ॲग्रो सर्व्हीसेस (नि.र.रू.३,७४,०००/- [र.रू.तीन लाख चौऱ्याहत्तर हजार] पेक्षा १.१७% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (र.रू.३,६९,६२४/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१६ विषय क्रमांक :- ११
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/वे/कावि/१९६/१० दि.२९/३/२०१०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २००९-१० चे सुधारित अंदाजपत्रकात “स्थायी अस्थापना” लेखाशिर्षावर “बोनस तथा सानुग्रह अनुदान” लेखाशिर्षातुन र.रु.२,२५,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१७ विषय क्रमांक :- १२
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - ड प्रभाग विद्युत प्रकल्प
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/जेएनएनयुआरएम/१७९/१० दि.२९/०३/२०१०.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नाशिकफाटा येथे पुणे मुंबई महामार्ग, रेल्वेलाईन व पवना नदीवरुन जाणारा नियोजित उड्डान पुलास अडथळा ठरणाऱ्या रेल्वे विभागाच्या अती उच्चदाब वाहिनी व टॉवर हालवीणेचे कामापोटी र.रु.२,०९,०७,३३५/- उड्डान पुलाच्या तरतुदीतुन रेल्वे विभागास अगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१८ विषय क्रमांक :- १३
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/९/कावि/१७७/१० दि.१७/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्या आयटीआय मोरवाडी,झोनिपु,भुमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१, कायदा विभाग व भुमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.२ या विभागाकरिता प्रति मशीन र.रू.६१,८२८/- ( सर्व करांसह व्हॅट जकातसह) प्रमाणे ५ नग मशीन करिता र.रू.३,०९,१४०/- खर्च येत असुन रेट कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने मे.फिनिक्स रिप्रोग्राफिक्स, पुणे यांचेकडुन झेरॉक्स मशीन खरेदीस येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९१९ विषय क्रमांक :- १४
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - दूरसंचार
सुचक- मा.जयक्षी गावडे अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/९६/१० दि.३०/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री. भाऊसाहेब भोईर, विरोधी पक्षनेता यांचेकरीता आयडीया यांचे अधिकृत विक्रेते मे. प्राईम इंटरप्रायझेस यांचेकडून ब्लॅकबेरी मॉडेल ९५३० स्टॉर्म या प्रकारचा मोबाईल थेट पध्दतीने करारनामा न करता व निविदा न मागविता प्रतिनग र.रू. २१,६००/- प्रमाणे खरेदी करणेस तसेच मोबाईल वापराची अधिकतम मर्यादा पूर्विप्रमाणेच कायम ठेवून ब्लॅकबेरी सूविधा पूरविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२० विषय क्रमांक :- १५
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांचे जावक क्र.
झोनिपु/स्था/नि/कावि/५४४/२००९ दि.९/७/२००९

मा. सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२६/२००८ - २००९ अन्वये, प्रभाग क्र.६१,६२ व ६३ मधील झोपडपट्टयांमध्ये स्थापत्य विषयक सुधारणा व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.आर.जी.मंगळवेडेकर (नि.र.रू.८,९२,५३४/- [र.रू.आठ लाख ब्याण्णव हजार पाचशे चौतीस] पेक्षा २६% कमी) या ठेकेदारा कडून निविदा दर मंजुर दराने र.रू.६,९३,४९९/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२१ विषय क्रमांक :- १६
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - विद्युत ब प्रभाग
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/२१५/१० दि.३०/३/२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.६० मधील बिजली नगर व शिवनगरी परिसरात दिवाबत्तीची व्यवस्था करणे या तातडीचे कामाकरीता प्राप्त दरधारकांपैकी लघुतम दरधारक मे.ऋषिकेश एन्टरप्रायझेस यांचेकडुन सदर काम अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३.२ % कमी दराने करुन घेणेस व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. [अं.र.रू.५०,०००/-]

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२२ विषय क्रमांक :- १७
दिनांक-०६.०४.२०१० विभाग-मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/१६९/१०दि.३०/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाकरीता ०३ नग Flash Autoclave Single Phase खरेदीकामी मे. वैभव ट्रेडर्स यांचेकडुन ई - टेंडरींग कार्यप्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदा दरानुसार करारनामा करुन खरेदी करण्यास व येणा-या र.रु.७,३१,९९७/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२३ विषय क्रमांक :- १८
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/३५/१० दि.३०/३/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.८.०३.२०१० ते १४.०३.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३५/२०१० दि.३०.३.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२४ विषय क्रमांक :- १९
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/३६/१० दि.३०/३/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.०३.२०१० ते २१.०३.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३६/२०१० दि.३०.३.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२५ विषय क्रमांक :- २०
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/नि/कावि/१९४/१०दि.३०/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Auto Cad Software खरेदी करणेसाठी यापुर्वी निविदा प्रसीध्द करणेत आली असता त्यास एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने फेर निविदा प्रसिध्द केली असता त्यास फक्त मे.औरा सॉफ्टवेअर प्रा.ली.., पुणे यांची एकमेव निविदा प्राप्त झ

ाली असल्याने व सदरच्या सॉफ्टवेअरची बांधकाम परवानगी विभागाला आवश्यकता असल्याने मे.औरा सॉफ्टवेअर प्रा.ली., पुणे यांचेकडुन Auto Cad Software खरेदी करणेस प्रत्यक्ष येणा-या र.रु.१०,११,६२४/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२६ | विषय क्रमांक :- २१

दिनांक-०६.०४.२०१० | विभाग - आरोग्य मुख्यालय

सुचक- मा.वर्षा मडीगेरी | अनुमोदक - मा.जयश्री गावडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/३/कावि/१४८/१० दि.३०/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० अन्वये, अ,ब,क,ड प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील हॉटेल /कॅन्टींगवेस्ट गोळा करणे व वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू.७,०८,१०० पेक्षा २२.७% कमी (प्रती दिन प्रती वाहन र.रु. १५००/-) (एकुण र.रु.५,४७,५००/- [र.रू.पाच लाख सत्तेचाळीस हजार पाचशे] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२७ | विषय क्रमांक :- २२

दिनांक-०६.०४.२०१० | विभाग-पाणीपुरवठा व जलनि:सारण

सुचक- मा.प्रशांत शितोळे | अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/४९५/१० दि.३०/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्या कासारवाडी येथील मलशुध्दीकरणाच्या तिन्ही केंद्रातून शुध्द केलेले पाणी पुन्हा Ultra Filtration करून औद्योगिक क्षेत्रासाठी पिण्या व्यतिरिक्त वापरासाठी पुरवठा करणेचे नियोजन असुन GTZIS, SOMA यांनी एकत्रित येऊन spv प्रस्थापित करून उपरोक्त प्रकल्प करण्याचे प्रस्तावित आहे प्रकल्प उभा करणे, वितरण व्यवस्था करणे, पाणी विकणे इ.कामे spv स्वःखर्चाने करणार असून महानगरपालिका पाणीपट्टी वसुल करणार आहे त्या मोबदल्यात महानगरपालिकेस टिपिंग चार्जेस मिळणार आहेत या प्रकल्पासाठी महानगरपालिकेमार्फत कासारवाडी येथील ३.३ एकर जागा २५ वर्षेकरिता लीज तत्वावर नाम मात्र दराने देणे, १२० MLD सांडपाणी विनामोबदला टप्प्या टप्प्याने देणेसाठी प्रकल्पाच्या त्रिस्तरीय (Triparti) करारनामा करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९२८ विषय क्रमांक :- २३
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/८९२/१० दि.२९/३/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ मधील अ.क्र.८ अन्वये, निगडी से.क्र.२२ येथील मनपाच्या शाळा क्र.२/१ येथे ६ वर्ग खोल्या इमारत बांधणेकामी (फेरनिविदा) मे.श्रीयश कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.३२,१३,५५३/- [र.रू.बत्तीस लाख तेरा हजार पाचशे त्रेपन्न] पेक्षा २९.५० % जादा) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ४१,६१,५५१/- [र.रू.एक्केचाळीस लाख एकसष्ठ हजार पाचशे एक्कावन्न] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०९२९ विषय क्रमांक :- २४
दिनांक-०६.०४.२०१० विभाग-जलशुद्धीकरण केंद्र से.२३ विद्युत
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/कावि/१४४/१० दि.३१/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

गवळीमाथा पंपींग स्टेशन येथील ३३५ एच.पी. क्षमतेच्या मोटरची बेअरिंग कोटेशन पद्धतीने तातडीने बदलणेचे काम मे.एक्सल इलेक्ट्रीकल्स् यांचेकडून करारनामा न करता करुन घेणेस व येणारा खर्च र.रु.४४,५४९/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०९३० विषय क्रमांक :- २५
दिनांक-०६.०४.२०१० विभाग-जलशुद्धीकरण केंद्र से.२३ विद्युत
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/कावि/१४३/१०दि.३१/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी लांडेवाडी पंपींग स्टेशन येथून संत तुकाराम नगर (आळंदी रोड) साठी पाणीपुरवठा करणाऱ्या १५० एच.पी. क्षमतेच्या H.S.C.P. पंपाची तातडीची दुरुस्ती करणेचे काम मे.एक्सल इलेक्ट्रीकल्स् यांचेकडून करारनामा न करता करुन घेणेस व येणारा खर्च र.रु.३५,९६६/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०९३१ विषय क्रमांक :- २६
दिनांक-०६.०४.२०१० विभाग-जलशुद्धीकरण केंद्र से.२३ विद्युत
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/कावि/१४२/१०दि.३१/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी लांडेवाडी पंपींग स्टेशन येथील १५० एच.पी. क्षमतेच्या त्याचप्रमाणे गवळीमाथा पंपींग स्टेशन येथील ३३५ एच.पी. क्षमतेच्या मोटर रिवायंडींगचे तातडीचे काम मे.एक्सल इलेक्ट्रीकल्स् यांचेकडून करारनामा न करता करुन घेणेस व येणारा खर्च र.रु.१,७०,६३९/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३२ विषय क्रमांक :- २७
दिनांक-०६.०४.२०१० विभाग - ड प्रभाग
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:-मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.ड/७/कावि/१५८/१०दि.३१/३/१०

मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा ड प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.८४ मधील घरोघरचा कचरा गोळा करणेकामी मे.व्यंकटेश्वरा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, थेरगांव यांचेकडून आरोग्य मुख्य कार्यालयाकडील अंदाजपत्रकीय रकमेच्या प्राप्त झालेल्या निविदा दरापेक्षा १० % कमी दराने दि.१/७/०९ ते २६/१०/०९ अखेर ५ कर्मचाऱ्यांकडून थेट पध्दतीने काम करून घेणेकामी र.रू.१,१०,२००/- [र.रू.एक लाख दहा हजार दोनशे] येणाऱ्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक :- १०९३३ विषय क्रमांक :- २८
दिनांक - ०६.०४.२०१० विभाग - स्थापत्य
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/१२१/२०१०
दि.४/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/०९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, प्रभाग क्र.३२ संत तुकारामनगर येथील विरंगुळा केंद्राचे स्थापत्य विषयक सुधारणाची कामे करणेकामी मे.शामा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,७६,५००/- [र.रू.अठरा लाख शहात्तर हजार पाचशे] पेक्षा २२.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,६३,६७०/- [र.रू. चौदा लाख त्रेसस्ठ हजार सहाशे सत्तर] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे

बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३४ विषय क्रमांक :- २९
दिनांक - ०६.०४.२०१० विभाग - भुमि आणि जिंदगी
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजिं/५/कावि/१३४/१० दि.५/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

आकुर्डी, खंडेरायाभाजी मंडई जवळील नाल्यावरील ५१ भाजी मंडई गाळे वितरण करणेकामी प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ मधील सर्वोच्च दराच्या निविदास्वीकृत करुन प्राप्त दर मासिक भाडे (मनपा शासन कराव्यतिरिक्त) प्रमाणे निविदा अटी/शर्ती नुसार मनपा करेत्तर शिफारशी नुसार दुसरे वर्षापासून प्रत्येक वर्षी भाडेदरात १२.५% वाढकरुन निविदा स्वीकृत करुन ५ वर्षाचे कालावधी करीता भाडेकराराने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३५ विषय क्रमांक :- ३०
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागातील आधार निधी योजना क्र.(१) आधार निधीतुन शिष्यवृत्ती वाटप या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणेकरिता अर्ज केलेल्या शैक्षणिक संस्थांचे नावे धनादेश अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३६ विषय क्रमांक :- ३१
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड संशोधन केंद्र यांचे संयुक्त विद्यमानाने “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सौजन्याने पिंपरी - चिंचवड संशोधन केंद्र, पिंपरी ” कासारवाडी येथे सुरु करण्यात आले असुन सदर केंद्राकरीता करारनाम्यानुसार दरवर्षी र.रु.१,००,०००/- पर्यंतची संशोधनात्मक अभ्यासक्रमास उपयुक्त पुस्तके / ग्रंथ मनपाच्या सार्वजनिक वाचनालयामार्फत खरेदी करुन देण्यास मान्यता देणेत आली असल्याने त्यानुसार पुस्तक खरेदीस व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३७ विषय क्रमांक :- ३२
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

मनपा हद्दीतील उद्यानांची देखभाल, विकास व संरक्षणाची कामे मंडळे/सामाजिक संस्था/महिला बचत गट यांना देणेत येत आहेत. सदर देखभालीची कामे संबंधित संस्थांना देणेमागे असा हेतु आहे की मनपा पर्यावरण कामकाजामध्ये नागरीकांचा सहभाग असावा. त्यांच्यामध्ये पर्यावरण विषयक कामकाजामध्ये आवड निर्माण व्हावी, तसेच येथील स्थानिक मंडळे/संस्था यांना याव्दारे रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी. सदर उद्यान देखभालीची कामे सदर संस्थांना देतांना किमान वेतन दराचे आधारे प्रतिमहा दरनिश्‍चिती करुन देणेत येत असल्याने त्याच पद्धतीने ती यापुढेही संबंधित स्थानिक मंडळांना कोणत्याही प्रकारचा प्रचलित निविदा दर लागु न करता पुर्वीचेच प्रचलित किमान वेतन दराआधारे देणेस व आवश्यकतेप्रमाणे त्याच दराने त्यांना मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३८ विषय क्रमांक :- ३३
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

दहावी / बारावीनंतर पुढे काय? असा प्रश्न सर्व विद्यार्थी व पालक यांना भेडसावत असतो. त्यादृष्टीने दहावी/बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर निवडण्यास व त्यादृष्टीने स्पर्धात्मक परिक्षांचा अभ्यास करण्यासाठी सीएटी व इतर अभ्यासक्रमास उपयुक्त पुस्तके महानगरपालिकेच्या वाचनालयात असावीत. मनपाच्या विविध वाचनालयात सीएटी व इतर अभ्यासक्रमास उपयुक्त पुस्तके (एक संच अंदाजे र.रु. १५,०००/- पर्यंत ) थेट पध्दतीने खरेदी करणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९३९ विषय क्रमांक :- ३४
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

जुनी सांगवी (गावठाण) वॉर्ड क्र. ९२ मधील मनपाची महिला व्यायामशाळा रहि माई महिला प्रतिष्ठान या मंडळाला दर महा रक्कम रु. २०००/- सेवा शुल्क आकारुन पाच वर्षे कालावधी करिता चालविणेस देणेस व त्या करिता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९४० विषय क्रमांक :- ३५
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

से.नं.२७ प्राधिकरण येथील श्री गजानन महाराज उद्यान ५ वर्षाकरिता देखभाल, विकास व संरक्षण करणेकामी श्री गजानन महाराज मंदीर चॅरीटेबल ट्रस्ट, प्राधिकरण यांचे कामकाज आजतागायत समाधानकारक असल्यामुळे श्री गजानन महाराज मंदीर चॅरीटेबल ट्रस्ट, प्राधिकरण यांना देण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९४१ विषय क्रमांक :- ३६
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

पिं.चिं.मनपातील शिक्षण मंडळ या विभागाचे बैठक व्यवस्था करणेचे कामास मा.विधी समितीने ठराव क्र. ४३० दि. ११/१२/२००८ नुसार मान्यता दिली आहे. सदर कामाची निकड लक्षात घेता व निविदा कार्यवाहीसाठी लागणा-या वेळेचा विचार करता शिक्षण मंडळाचे नुतनीकरणाचे काम सद्यस्थितीत चालु असलेले संगणक विभागाचे नुतनीकरणाचे कामातुन तसेच सदर काम करत असलेले ठेकेदार मे.पी.एल.परडीकर यांचेकडुन चालु असलेल्या कामाचे दराने म्हणजे सन २००७ - ०८ चे दरसुचीप्रमाणे ९% कमी दराने शिक्षण मंडळ या विभागाचे काम करुन घेण्यास व त्याचे र.रु.३४,०६,८३०/- चे अंदाजित खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९४२ विषय क्रमांक :- ३७
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

पिं.चिं.म.न.पा च्या सर्व संगणक प्रणालीमध्ये मायक्रोसॉप्ट ऑफीसचे अधिकृत वापर करणेकरीता मनपाच्या सर्व संगणक संचावर अधिकृत सॉप्टवेअर बसविणेकरीता केंद्र शासनाच्या डि.जी.एस.अँड डी मान्यताप्राप्त केंद्र शासन मान्यताप्राप्त दरपत्रकानुसार व मान्यतेनुसार सदर कामाकरीता मे.एस ब्रेन सिस्टम अँड सॉप्टवेअर पुणे यास निविदा न मागविता थेट पध्दतीने घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९४३ विषय क्रमांक :- ३८
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

मा.सभापती स्थायी समिती, मा.महापौर, मा.पक्षनेता व मा.विरोधी पक्षनेता तसेच मा.अंबादास चव्हाण अतिरिक्त शहर अभियंता व आवश्यक त्या (सुपरक्लास-१) वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांस वायरलेस ब्रॉड बॅण्ड सेवा तसेच हायस्पीड यु.एस.बी. हार्डवेअर इतर अधिकाऱ्यांप्रमाणे करुन देणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १०९४४ विषय क्रमांक :- ३९
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

खाली नमुद केलेल्या संस्थांकडून त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या वॉर्डातील दैनंदीन साफसफाई करुन घेणेकामी लागणारे आवश्यक ते स्वयंसेवक किमान वेतन दराने उपलब्ध करुन घेउन त्यांचेकडून पुढील ३ वर्ष कालावधीत दैनंदीन साफसफाई करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | समृद्ध भारत स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था | ७५ |
| २) | अमरदीप मित्र मंडळ थेरगाव | ८२ |
| ३) | सावित्रीबाई महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था | |
| ४) | अखिल बिजलीनगर प्रतिष्ठाण | ६१ |
| ५) | सुर्योदय स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था | ७० |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०९४५ विषय क्रमांक :- ४०
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.आशा सुर्यवंशी,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

चिंचवड येथील दत्तात्रय मरळ उद्यान व सिल्व्हर गार्डन उद्यान अखील बिजलीनगर प्रतिष्ठाण यांचेकडून किमान वेतन दराने स्वयंसेवक उपलब्ध करुन घेऊन त्यांस पुढील ५ वर्षे कालावधीकरीता देखभाल,संरक्षण, चालनकामी देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०९४६ विषय क्रमांक :- ४१

दिनांक - ०६.०४.२०१०

सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

पिं.चिं.म.न.पा.च्या आवश्यक त्या सर्व विभागांकरीता परफोट्रॅक (Perfotrack) हे सॉफ्टवेअर सर्व ठेकेदारांकडून कार्यान्वित करवून घेणेकामी मे.मॅप्स इन्फोटेक या संस्थेची मनपाची याप्रकारचे काम करणारी अधिकृत संस्था म्हणून मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०९४७ विषय क्रमांक :- ४२

दिनांक - ०६.०४.२०१०

सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

स्वामी समर्थ उद्यान, यमुनानगर मे.महाराष्ट्र एज्युकेशन ॲण्ड मेडिकल फाऊंडेशन यांना दिनांक १२/११/०९ पासून पुढील ५ वर्षांचे कालावधीसाठी प्रतिमहा म.न.पा. दराने देखभालीस व संरक्षणाकामी देणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०९४८ विषय क्रमांक :- ४३

दिनांक - ०६.०४.२०१०

सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

चिंचवड सुदर्शन नगर येथील सुदर्शन महिला हेल्थ क्लब ॲम्बिशियस स्पोर्टस् क्लब यांस द.म.र.रु.१६००/- अंशत: सेवाशुल्क तत्वावर पुढील ५ वर्षे कालावधीकरीता देखभाल,संरक्षण व चालनकामी देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०९४९ विषय क्रमांक :- ४४

दिनांक - ०६.०४.२०१०

सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

मोशी येथे शिवजयंती उत्सवाकरीता ध्वनीक्षेपण व विद्युत व्यवस्था करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.४२,०००/- पेक्षा ५.९% कमी या दराने मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ॲण्ड इलेक्ट्रीकल्स,निगडी यांस र.रु.३९,५२२/-करारनामा न करता अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १०९५०　　　　　　　　　　विषय क्रमांक :- ४५
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे　　　　　　　　　　अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.प्रभाकर वाघेरे, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

मनपाचे हद्दीतील मनपाचे मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र.३३३ हे मौजे सांगवी येथील स.नं.८४ मध्ये असून सदर जागा मनपाच्या ताब्यात असल्याने सदर जागेवर महिला बालकल्याण विभागाच्या महिला बचतगट महासंघाच्या प्रकल्पाकरीता शिव-जिजाऊ महिला प्रतिष्ठाण या महासंघास अल्पदराने ३० वर्षांच्या करारनाम्यावर देणेकरीता तसेच याच ठिकाणी नागरिकांना उपयोगी असे विविध प्रकल्प राबविणेकरीता योग्य त्या विभागांशी योग्य तो विचार करुन मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०९५१　　　　　　　　　　विषय क्रमांक :- ४६
दिनांक - ०६.०४.२०१०
सुचक- मा.रामदास कुंभार　　　　　　　　　　अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:-मा.रामदास कुंभार, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव...

सन १०-११ चे अंदाजपत्रकामध्ये पान क्र.२३१ अ.क्र. दिघी येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे व पान क्र. ६९५ अ.क्र.३ वॉर्ड क्र.१३ दिघी येथील दफन भूमीत सीमाभिंत बांधणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे या शिर्षकावर तरतूद अनुक्रमे र.रु.१०,००,०००/- व २१,००,०००/- एवढी आहे. वरील लेखाशिर्षावरील अनुक्रमे प्रत्येकी र.रु.१०,००,०००/- अशी एकूण र.रु.२०,००,०००/- तरतूद अंदाजपत्रकातील पान क्र. २१३ अ.क्र.२३ प्रभाग क्र.१३ दिघी येथील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.　नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/४७१/२०१०　　　　　　　　सही/-
दिनांक - ०८/०४/२०१० चे लगत　　　　　　　　नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.